




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७२१ . वा | बुधवार | दि. २७ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# भाजपच्या आमदारांनी बदलली भूमिका,पक्षश्रेष्ठींनी उमेदवार बदला !

# पक्षश्रेष्ठींनी उमेदवार बदलण्याची केली मागणी?

## भाजप कार्यकर्त्यांचा नेत्यांवर जोरदार दबाव, सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा पाठपुरावा उमेदवार बदलाचे संकेत?



**भाग-15**

**जनसंचलन/बुलढाणा**

सुरवातीला लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेनेच्या प्रतापराव जाधव यांना लपूनछपून पाठिंबा देणाऱ्या भाजपच्या काही लोकप्रतिनिधींना (ज्यात काही आमदार आहेत) कार्यकर्त्यांच्या जबरदस्त रेट्यामुळे आपल्या भूमिकेपासून अक्षरशः यू-टर्न घ्यावा लागला आहे. तसेच कार्यकर्त्यांच्या संतप्त भावना जाणून त्यांनीही प्रतापरावांच्या उमेदवारीला महायुती मेळाव्यात विरोध करण्याचे धाडस दाखवावे लागले कार्यकर्त्यांच्या या तीव्र रेट्यापुढे लोकप्रतिनिधींना आणि प्रस्थापितांना झुकावे लागले आणि यूटर्न घेऊन आपली भूमिका बदलावी लागली. तोच कित्ता आता भाजप पक्षश्रेष्ठींना गिरवावा लागणार आहे. त्यामुळे आता बुलढाणा लोकसभेसाठी प्रतापराव जाधव यांची उमेदवारी कापणे हे भाजप नेतृत्वासाठी अनिवार्य बनल्याचे दिसत आहे.या राजकीय भूमिकेला भाजपा कार्यकर्ते व मतदारांच्या नापसंती मुळे मजबूत करण्याचे काम सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन कडून करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने आमची ही भूमिका महत्वपूर्ण ठरते. सातत्याने २००९ पासून प्रतापराव जाधव हे बुलढाण्याचे खासदारकी उपभोगत आहेत. निवडणुकीत सगळ्यांना चोपडायचे, भाजपच्या कार्यकर्त्यांची मदत घ्यायची, भाजपच्या मतदारांची मते खायची, परंतु एकदा निवडून आले की, पुन्हा नाही तिथे हात पुसून मोकळे व्हायचे आणि केवळ स्व-विकासाचा अजेंडा चालवायचा,असा प्रकार प्रतापराव १५ वर्षांपासून करीत आहेत. प्रतापरावांच्या या डबल ढोलकी व स्वार्थी भूमिकेमुळे एकीकडे जिल्ह्याचा विकास रखडला,जनतेला विकासाची फळे चाखायला भेटत नाही, तर दुसरीकडे प्रतापराव हे सातत्याने ज्या भाजप कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या भरोश्यावर निवडून येतात, नंतर त्यांनाही ठेंगाच दाखवतात. जिल्ह्यात कुठेही भाजपचा लोकप्रतिनिधी निवडून यावयाचा असला की, प्रतापराव त्याला विरोध करतात. हे सर्व आरोप सध्या भाजपचेच पदाधिकारी व कार्यकर्ते करीत आहेत.भाजप-शिवसेनेच्या विविध ठिकाणी होणाऱ्या मेळाव्यांमधून सध्या हेच सूर आळवू जाऊ लागले आहेत. भाजप कार्यकर्त्यांच्या भावना प्रतापरावांच्या विरोधात टोकदार झालेल्या असल्या, तरी काही लोकप्रतिनिधी हे आत्तापर्यंत प्रतापरावांसाठी सॉफ्ट कॉर्नर ठेवून होते काही लोकप्रतिनिधी हे बहुचर्चित स्वार्थासाठी त्यामुळेच काही दिवसांपूर्वी आमदार संजय कुटे यांनी एक ट्वीट करून प्रतापरावच नंबर वन असे सूचक विधान केले होते. हे ट्वीट पाहून अनेक भाजप कार्यकर्त्यांचा तीव्र संताप झाला. तळपायातली आग मस्तकात देखील गेली. ज्या प्रतापरावांनी सातत्याने भाजपला डावलण्याचे काम केले, पुन्हा त्याच प्रतापरावांची धुणी धुवायची. किती वर्षे आम्ही हे काम करायचे, असा संतप्त सवाल भाजप कार्यकर्ते व्यक्त करू लागले आहेत. प्रतापरावांच्या हेकेखोर आणि मतलबी भूमिकेमुळेच गेल्या वर्ष-दीड वर्षापासून भाजप कार्यकर्ते यंदा आपल्याच पक्षाचा खासदार हवा, अशी मागणी करीत होते. दरम्यानच्या काळात प्रदेशाध्यक्ष बावनकुळे संघटन मंत्री डॉ कोठेकर, लोकसभा समनवयक दिनेश सूर्यवंशी ,केंद्रीय मंत्री तथा जिल्हा प्रभारी भूपेंद्र यादव यांनी घेतलेल्या बैठकांमध्ये सुद्धा प्रतापराव यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध झाला त्या वेळी कार्यकर्त्यांचा जोश वाढविण्यासाठी जिल्ह्यात या वर्षी कमळ चिन्हाचाच उमेदवार असणार असे स्पष्ट आश्वासन दिले होते त्यामुळे भाजपाचे इच्छुक उमेदवार विजयराज शिंदे जिल्ह्यात फिरत राहिले पण निराशा पदरी येऊन पडत आहे त्याला पक्षनेतृत्वाने देखील योग्य प्रतिसाद दिला होता. त्यामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास दुणावला होता. परंतु गेल्या काही दिवसांपासून प्रतापराव हे जणूकाही आपल्याला उमेदवारी घोषित झाल्याच्या थाटात कार्यक्रम व मेळावे घेऊ लागले आहेत. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता वाढत चालली होती. यातच संजय कुटे यांचे ट्वीट आल्याने तर भाजप कार्यकर्त्यांचा पारा चांगलाच चढला होता. अखेर खामगाव येथे झालेल्या मेळाव्यात भाजपच्या लोकप्रतिनिधींना (आमदार) आपल्या भूमिकेत बदल करावा लागला व त्यांनीही कार्यकर्त्यांची भावना समजून घेतली. तसेच कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर पक्षश्रेष्ठी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. भाजप कार्यकर्त्यांना या वेळेस काहीही झाले तरी प्रतापराव नकोत, ही भूमिका जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना तर पटली. आता गरज आहे ती भारतीय जनता पक्षाच्या शिर्षस्थ नेत्यांनी या भावना समजून घेण्याची. एकीकडे जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि कार्यकर्त्यांचीही भावना जपायची असेल तर आधी प्रतापरांना बाजूला करणे अनिवार्य आहे, हे पक्षश्रेष्ठींनी ठरवल्यास आणि त्यावर अंमलबजावणी केल्यास नक्कीच भाजपला देखील जिल्ह्यात नवसंजीवनी प्राप्त होऊ शकते. सध्या भाजपकडे हा मतदारसंघ घेण्यासाठी भाजप इच्छुक आहे आणि भाजपकडून निवडणूक लढण्यास बुलढाणा अर्बनचे संस्थापक राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांना उमेदवारी भेटण्याची चर्चा खूपच जोरात सुरू आहे. या स्थितीत भाजपचे कार्यकर्ते देखील मोठ्या प्रमाणात भाईजींच्या उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. भाईजींच्या विकासाची दृष्टी, त्यांच्या कामाचा झंझावात, भाजप-संघ नेत्यांशी असलेले त्यांचे संबंध या सर्व गोष्टी जमेच्या ठरू शकतात. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खरंच ४०० पार चे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर बुलढाणा जिल्ह्यात प्रतापरावांचे तिकीट कापून ते विकास पुरुष भाईजींना देण्यात यावे, अशी जोरदार चर्चा जिल्ह्यात आहे आणि विशेषतः भाजप कार्यकर्त्यांमध्ये. याच भावनेची जाण ठेवल्यास यंदा जिल्हा भाजपला पहिल्यांदा स्वतःचा व हक्काचा खासदार मिळू शकेल, यात काही शंका नाही.

**(मतदारांचा कानोसा...)**

### भाईजी तुम्ही उभे रहाच...



जिल्ह्यात प्रतापरावांच्या विरोधात तीव्र असंतोष आहे मतदार संघातील महायुतीचे आणि प्रतापरावांना विरोध करणारे नेते,कार्यकर्ते पदाधिकारी आणि गठ्ठा मतदान मिळवून देण्याची ताकत असलेले बूथ लेवलचे कार्यकर्ते प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या भाईजीना विनंती करत आहेत भाईजी तुम्ही उभे रहाच आम्हाला मोदींच पंतप्रधान हवेच. विकास पुरुष मोदींच्या टीम मध्ये जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन असलेले भाईजींच आम्हाला हवेच भाईजी तुम्हाला समाजाच्या सर्व स्तरातील मतदार राजा भरघोस मताधिक्यणी विजयी करेल हा विश्वास आम्ही देत आहोत

---

# कार व दुचाकीच्या भीषण अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी

**जनसंचलन/चिखली**

उदयनगर फोर व्हीलर कार व दुचाकी यांच्यात अपघात झाल्याने दुचाकी वरील तिघेजण जखमी झाले. सदर घटना २५ मार्च रोजी दुपारी ४ - वाजेच्या सुमारास किन्ही सवडत नजीकच्या कुसुंबा कुसुमी शिवारात घडली. जखमी दुचाकी स्वारांना चिखली येथील खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. पाहुणे अपघातात जखमी झाले म्हणून त्यांना भेटण्यासाठी अकोला येथे जात असतांना यामाहा दुचाकी क्रमांक ४८ सीई ६३३३ ने एम एच उदयनगर कडून अकोल्याकडे जात असतांना विरुद्ध दिशेने येणारी कार क्रमांक एम.एच.१२ डीएस. ५४४३ यांचा कुसुंबा कुसंबी शिवारात हॉटेल मामाचा मळा नजीक अपघात झाला. यामध्ये दुचाकी वरील प्रसन्न तळेकर, प्रशांत सुरोसे, व सुरज वाळेकर रा. जुना गाव चिखली तिघे जखमी झाले असून यातील एकाची तब्येत गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. जखमी रुग्णांना उदयनगर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या १०२ रुग्णवाहिकेने चालक सतिश रावळकर यांनी उपचारार्थ चिखली येथे दाखल केले आहे. माहिती मिळताच अमडापुर पोलिसांनी घटनास्थळ गाठुन दोन्हीही वाहनांना पो.स्टे.ला लावण्यात आलेले असून वृत्त लिहेपर्यंत पोस्टेला तक्रार दाखल झालेली नव्हती


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पर्यटकांच्या ऐतिहासिक होळीवर व्यावसायिकांची निराशा!

## होळी दहनात केवळ ३० टक्के भाविक उपस्थित होते...





जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील पिपळगाव सराई या गावापासून काही अंतरावर हाजी अब्दुल रहमान उर्फ सैलानी शाह बाबा यांचा दर्गा आहे. रविवार २४ मार्च रोजी होलिका दहनानंतर यात्रा उत्सवाला सुरुवात झाली आहे. मात्र, यंदा यात्रोत्सवात केवळ ३० ते ४० टक्केच भाविकांची उपस्थिती असल्याने व्यावसायिकांची चिंता वाढली आहे. याआधी होलिका दहन आणि यात्रा उत्सवादरम्यान एवढी गर्दी कधीच दिसली नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सर्व धर्मीयांचे तीर्थस्थान असलेल्या हाजी अब्दुररहमान उर्फ सैलानी शाह बाबा यांचा उर्स आणि यात्रा उत्सव होलिका दहनाने सुरू झाला आहे. सैलानी बाबाची यात्रा देशभर प्रसिद्ध आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत होलिका दहन आणि संदल शरीफ पार पाडले जाते. अनेक व्यावसायिकांचे वार्षिक बजेट यात्रा उत्सवावर अवलंबून असते, तर छोटे-मोठे कार्यक्रम व्यावसायिकांच्या घरावर अवलंबून असतात. सैलानी बाबा यात्रोत्सवात दरवर्षी सहभागी होणाऱ्या काही तज्ज्ञ आणि व्यावसायिकांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, यात्रोत्सवात केवळ ३० ते ४० टक्के भाविक सहभागी होतात. भाविक व खरेदीदार नसल्याने व सध्याची परिस्थिती पाहता दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले आहे. कोरोना महामारीनंतर पहिल्यांदाच असे घडले, तर ऐतिहासिक होलिका दहनाच्या निमित्ताने पर्यटक बाबा नगरीमध्ये भाविकांची मोठी कमतरता होती. पूर्वीच्या होलिका दहनाच्या वेळी चालण्यासाठी जागाच उरली नव्हती, तर यंदा रस्त्यांवर शांतता असून चारचाकी वाहने सहज धावताना दिसत आहेत. खरेदीदारांच्या प्रचंड तुटवड्यामुळे व्यावसायिक निराश दिसत आहेत.

होलिका दहनावर व्यावसायिकांची निराशा झाली आहे. होलिका दहनानंतर भाविक आपापल्या घरी परतले आहेत. सध्या पर्यटकांमध्ये यात्रा उत्सव नसून अमावस्या असल्याचे भास होत आहे. आता व्यावसायिकांची शेवटची आशा संदल शरीफ आहे, संदलमध्ये अशीच परिस्थिती राहिल्यास व्यावसायिकांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.

# रेतीची तस्करी रोखा अन्यथा सात-बारावर बोजा चढवू!

जनसंचलन/दुसरबीड

तालुक्यातील निमगाव वायाळ, हिवरखेड पूर्णा, राहेरी, तढेगाव ताडशिवणी, लिंगा येथील खडकपूर्णा नदीपात्रातून खुलेआम रेतीची चोरटी वाहतूक सुरू आहे. नदीकाठावर शेती असलेल्या शेतकऱ्यांना अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रेतीची तस्करी न रोखल्यास सात-बारावर बोजा चढविण्यात येणार आहे. दुसरबीड परिसरात खडकपूर्णा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतूक सुरू आहे. महसूल विभागाने कारवाईचा सपाटा सुरू केला असता तरीही वाहतूक सुरूच आहे. महसूलचे पथक कारवाईसाठी निघाल्याबरोबरच त्याची माहिती रेतीमाफियांपर्यंत पोहचते. त्यामुळे प्रशासनाला कुठलीही कारवाई करता येत नाही. सिंदखेड राजा तहसीलदारांनी नदीकाठावर शेती असलेल्या शेतकऱ्यांना रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक त्यांच्या शेतातून होऊ देऊ नका, अशा सूचना केल्या आहेत. तरीही उत्खनन होत असल्यास शेतकऱ्यांच्या सात-बारावर बोजा चढविण्याचा इशारा दिला आहे.

# इसमास रस्त्यात अडवून खिशातून ११०० रुपये काढले

जनसंचलन/ खामगाव



खामगाव रस्त्याने पायी जात असलेल्या इसमास तिघांनी काँग्रेस भवनजवळ अडवून बळजबरीने त्यांच्या खिशातून ११०० रुपये काढून घेतल्याची घटना काल घडली. येथील मस्तान चौक भागातील इस्माईल खान अब्बास खान (५५) हे काल बसस्थानकावरून घरी जाण्यासाठी रस्त्याने पायी जात होते. दरम्यान काँग्रेस भवननजीक तीन अज्ञात युवकांनी त्यांना वाटेत अडवून बळजबरीने त्यांच्या खिशात हात घालून ११०० रुपये काढून घेतले व ते तिघे पसार झाले. भरदिवसा घडलेल्या या प्रकाराने खळबळ उडाली होती. याबाबत इस्माईल खान यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली असून यावरुन पोलिसांनी तीन अज्ञात युवकांविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# मतदानासाठी जिल्ह्यात शालेय विद्यार्थी देणार आई-बाबांना संकल्पपत्र स्वीप अंतर्गत विविध मतदार जनजागृतीसाठी उपक्रम

जनसंचलन/ खामगाव

मागील लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण लक्षात घेता ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान व्हावे या उद्देशाने स्वीप अंतर्गत मिशन डिस्टिंक्शन ७५ टक्के हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत शालेय मुले आता आई-बाबांना संकल्पपत्राद्वारे मतदान करण्याचे आवाहन करणार आहेत. हे संकल्पपत्र मले पालकांकडन भरून घेणार आहेत अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे, जिल्ह्याचे मिशन डिस्टिक्शन हे ध्येय पूर्णत्वास यावे, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप अंतर्गत हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे मलांच्या आवाहनाला आई-बाबा सकारात्मक प्रतिसाद देऊन सर्वाधिक संख्येने मतदान करतील. सर्व शाळांमध्ये हा उपक्रम गावोगावी राबविला जाईल. लोकसभा मतदारसंघासाठी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. जिल्हा प्रशासनाने लोकसभा मतदारसंघामध्ये ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाचे ध्येय ठेवले आहे

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# बाळापुर फैलात दोन कुटुंबात हाणामारी परस्परविरोधी तक्रारीवरुन चौघांवर गुन्हा...

जनसंचलन/खामगाव

शुल्लक कारणावरुन वाद होवून दोन कुटुंबात हाणामारी झाल्याची घटना स्थानिक बाळापुर फैल भागात घडली. या प्रकरणी परस्पर विरोधी तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. काल सायंकाळ दरम्यान बाळापूर फैल भागातील खोसे व शिंदे कुटुंबात वाद झाला. या वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. याप्रकरणी सौ. कुसुम लिंबाजी शिंदे (४०) यांच्या तक्रारीवरून शेषराव विष्णु खोसे (५०) व प्रेम खोसे (२२) या दोघांविरुध्द तर शेषराव विष्णु खोसे यांच्या तक्रारीवरुन राम शिंदे (३०) व लिंबाजी शिंदे यांच्याविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ भादंवीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने होळी उत्सव उत्साहात साजरा...

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक सतिफैल भागातील धार्मिक व सामाजिक क्षेत्रात सतत अग्रेसर रहाणारे सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या संकल्पनेतून मागिल २४ वर्षा पासून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम मुख मे हो राम नाम राम सेवा हाथ मे हे ध्येय घेऊन अखंड पणे सुरू आहे आज दिं २५-३-२०२४ सोमवार रोजी होळी उत्सवा निमित्त धुळीवंदन च्या दिवशी दुपारी १ वा श्री सदगुरू एकनाथ महाराज व शिव पार्वती यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पुजन देविदास शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले व नंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या मध्ये दुपारी २ ते ३ भजन. ३ ते ५ श्री शिवाय नमःस्तुभ्यम १००८



वेळा सामुहिक जप,नामस्मरण, नंतर रंग बिरंगी फुलांच्या पाकळ्या उधळून होळी उत्सव साजरा केला संध्याकाळी ५ -३० वा महाआरती करून. सर्वांना अभिर.गुलाल लावून. प्रसाद वाटप करूण कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या प्रसंगी अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलिप झापर्डे. लालाजी सांगळे.हनुमानसिंह ठाकूर, सत्यमसिंह ठाकूर, विरल चुनेकर, गोपाल लाड,विजय सुकाळे,दादा ठाकूर,किरण लांडगे,आशाबाई अंधारे. मंगला बावस्कर, जया सुकाळे.जयश्री झापर्डे. संगिता देशमुख. शकुंतला ढवळे. अंबिका काटकर,थोरात, सरिता ठाकूर,अस्मिता ठाकूर,शोभा ठाकूर,अर्चना ढवळे,उषा चुनेकर,छकुली सुकाळे,जान्हवी भक्ती सुकाळे,शर्मा,आराध्या ढवळे, व परिसरातील अनेक महिला व पुरुषांची उपस्थिती होती अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# धाड जिल्हा परिषद सर्कल भाजपा युवा मोर्चाची संघटनात्मक बैठक संपन्न...

जनसंचलन/धाड



धाड जिल्हा परिषद सर्कल मधील भारतीय जनता युवा मोर्चा च्या प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक भारतीय जनता युवा मोर्चा नवनियुक्त बुलढाणा तालुकाध्यक्ष सतिश भाकरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकी दरम्यान युवा मोर्चाच्या व्यापक विस्तारावर संवादात्मक चर्चा करून आगामी काळात संघटन मजबूत करण्याचा सर्वानुमते संकल्प करण्यात आला. यावेळी भाजपा युवा मोर्चा बुलढाणा तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल युवा मोर्चा धाड जिल्हा परिषद सर्कल च्या वतीने सतिश भाकरे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीला धाड जिल्हा परिषद सर्कल मधील प्रमुख पदाधिकारी सिद्धेश्वर लडके, प्रवीण वाघ, गजानन सपकाळ, सागर भास्करराव जट्टे, अमोल पालकर, विलास वाघ, गजानन वाघ, शिवाजी वाघ, अजय वाघ, समाधान पडोळ, दत्तात्रय सोनुने, प्रसाद चांदा, कैलास उबाळे, धीरज लहाने यांची उपस्थिती होती.

# ट्रॅक्टर बुलेटच्या अपघातात १ ठार १ गंभीर

जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेड राजा रंगपंचमीच्या दिवशी दे. राजा कडून शहराकडे येणाऱ्या बुलेट ला ट्रॅक्टरचा भिषण अपघात होऊन एक जण जागी ठार तर एक गंभीर असून जखमीवर कलावती रुग्णालय जालना येथे उपचार सुरू आहेत सविस्तर वृत्त असे की २५ मार्च रोजी दुपारी दीड वाजेच्या दरम्यान अजित राजेंद्र जाधव व समाधान प्रकाश जाधव हे दोघे अविनाश किसन चव्हाण यांच्या हॉटेलवरून बुलेट क्रमांक २८. ३६७५ ह्या मोटार सायकल ने सिंदखेडराजा येथे हॉटेलचे सामान आणण्याकरता जात असताना अजित राजेंद्र जाधव व त्यांचा मित्र समाधान प्रकाश जाधव हे बुलेटने सिंदखेडराजाकडे येत असताना फॉरेस्ट जंगला जवळील लाल माती जवळ सोनालिका कंपनीच्या ट्रॅक्टर भरधाव टॅक्टरने त्यांच्याबलेटला समोरून धडक दिली त्यामुळे बुलेट वरील अजित राजेंद्र जाधव व समाधान प्रकाश जाधव हे गंभीर जखमी होऊन डांबरी रोडवर पडले त्यांच्या मागेच हॉटेल मालक अविनाश किसन चव्हाण असल्याने त्यांने खासगी रिक्षाने बोलून दोघांना हि ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे उपचार करता आणण्यात आले परंतू डॉक्टरने त्यांना तपासले असता अजित राजेंद्र जाधव हा मरण पावल्याचे सांगितले व समाधान प्रकाश जाधव यांचा डावा हात व उजवा पाय मोडला असून डोक्यात पाठीला खांद्याला मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना डॉक्टरांनी पुढील उपचाराकरता दवाखान्यात पाठवण्यात आले. या अपघाताचा तपास ठाणेदार ब्रह्मदेव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पो हे कॉ अनिल खारडे व पो कॉ ज्ञानेश्वर दहातोंडे हे तपास करीत आहे.

# सैलानी यात्रेत तीन वर्षीय मुलाच्या अपहरणाचा प्रयत्न आरोपीस केली अटक...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी यात्रेत २४ मार्चच्या मध्यरात्री जांभळीवाले बाबा दर्ग्यानजीक एका भाविकाच्या राहुटीमधून तीन वर्षीय मुलाचा अपहरण करण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणी आरोपीच्या विरोधात रायपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी लोणार येथील विलास शेषराव शिंदे यांनी पोलिसांत तक्रार दिली. होळीच्या दिवशी रात्री एक वाजण्याच्या दरम्यान जांभळीवाले बाबा दर्गा परिसरामध्ये त्यांनी राहुटी उभारली होती. त्यामध्ये नातेवाइकासोबत ते राहत होते. दरम्यान, त्यांचा नातू हा आईसोबत राहुटीमध्ये झोपलेला होता. त्यावेळी दोन दिवसांपूर्वीही एक मुलगा बेपत्ता सैलानी यात्रेत गेल्या चार दिवसांपूर्वीही एक तीन वर्षाचा मुलगा बेपत्ता झाला आहे. परभणी येथील तो असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे सैलानी यात्रेत रात्रीच्या वेळी लहान मुलांवर पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. प्रसंगी एखादी मुले पळवून नेणारी टोळीही सक्रिय झाली असावी, अशी शक्यता व्यक्त होत आहे. आरोपी शेख सुलतान शेख हबीब (रा. पीरनगर, जिल्हा नांदेड) याने



रात्रीच्या वेळी राहुटीमध्ये घुसून तीन वर्षीय मुलाला उचलून नेले. हा प्रकार विलास शिंदे यांनी बघितला. शिंदे यांनी त्वरित हालचाल करत, आरोपी शेख सुलतान शेख हबीब यास पकडून रायपूर पोलिसांच्या स्वाधीन केले. प्रकरणी रायपूर पोलिसांनी शेख सुलतान शेख हबीब याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य पाहता, अप्पर पोलिस अधीक्षक बी.बी. महामुनी, तसेच एसडीपीओ सुधीर पाटील यांनी २५ मार्च रोजी रायपूर पोलिस स्टेशनला भेट देऊन आरोपी शेख सुलतान शेख हबीब याची कसून चौकशी केली. त्यानंतर, त्यास न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. या प्रकरणी रायपूर ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय ओम प्रकाश सावळे तपास करीत आहे. या प्रकरणातील आरोपी हा तृतीयपंथीच्या वेशात होता. या घटनेमुळे कुटुंबात मात्र घबराट आहे.

# फरार आरोपीच्या घरातून तलवार केली जप्त

जनसंचलन/खामगाव

सजनपुरी येथील एका फरार आरोपीच्या घरातून शिवाजी नगर पोलिसांनी तलवार जप्त केली आहे. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी काल सकाळी सजनपुरी येथील फरार आरोपी गब्बु किसन गुजरीवाल याच्या घरी छापा मारला असता त्याच्या घरात एक तलवार मिळून आली.



यावेळी पोलिसांनी सदर तलवार जप्त करून याप्रकरणी गुजरीवाल याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांच्या माध्यमातून स्थानिक व्यापाऱ्यांचे संभ्रम झाले दूर

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आठवडी बाजाराचे मागील आठवड्यात भूमिपूजन झाले होते मात्र हे भूमिपूजन झाल्यानंतर स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. हा संभ्रम दूर करण्याकरिता समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी तसेच संबंधित ठेकेदाराला बोलवून स्थानिक व्यापाऱ्यांचा संभ्रम दूर केला आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आठवडी बाजाराचे मागील आठवड्यात भूमिपूजन करण्यात आले होते मात्र या भूमिपूजना नंतर स्थानिक व्यापाऱ्यांना समोरील सार्वजनिक वाचनालय परिसरात स्थलांतर करण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकाऱ्यांनी दिले होते यामुळे व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या संभ्रमाचे निवारण करण्यासाठी समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी व बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराला त्या ठिकाणी बोलवून आठवडि बाजाराची पाहणी केली व हे बांधकाम दोन टप्प्यात होणार असल्याचे सांगितले यामध्ये पहिल्या टप्प्यात रस्ते व भाजी विक्रेत्यांसाठी ओटे बांधकाम करण्यात येणार असल्याचे सांगितले तसेच व्यापाऱ्यांनी दुसरीकडे स्थलांतरित न होता याच ठिकाणी आपल्या जागेचे व दुकानाचे विभाजन करून होणाऱ्या विकास कामांना सहकार्य करण्याचे असे आवाहन समतेचे निळे वादन संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांनी व्यापाऱ्यांना केले. सदर आठवडी बाजाराचे भूमिपूजन झाल्यानंतर आम्हाला सार्वजनिक वाचनालयाच्या पटांगणात स्थलांतर करण्याचे सांगण्यात आले होते याकरिता आमच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता, तसेच सार्वजनिक वाचनालयाच्या पटांगणावर मुलींची शाळा, व विविध कार्यक्रम नेहमीच होत असतात यामुळे आम्हाला ते मान्य नव्हतं यामुळे आम्ही समतेचे निर्वादन संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना आमची समस्या सांगितली भाई अशांत वानखेडे हे तात्काळ आठवडी बाजारात पोहचून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्मचारी व ठेकेदाराला बोलवून आम्हाला योग्य तो न्याय दिला त्याबद्दल भाईंचे आभार..

# रामनगरमध्ये आजपासून अखंड हरिनाम सप्ताह...


## विविध कार्यक्रमांची राहणार मांदियाळी

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील रामनगर (भरोसावाडी) येथे वै.प.पू.देवपुरी बाबा यांच्या प्रेरणेतून गत ५० वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह व महाविष्णुयाग यज्ञाचे आयोजन केले जाते. यंदा या उत्सवाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, यावेळी रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या वाणीतून श्रीरामकथा पार पडणार आहे. मारुतीबाबा कुरेकर, संदीपान महाराज शिंदे हासेगावकरी, विजय बापू सत्ताधार, गंधीजर बाबा, हभाप प्रकाशबुवा जवंजाळ यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात आयोजित भक्तिमय सोहळ्यात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीरामकथा, हरिपाठ, यज्ञाहुती व हरिकीर्तन आदी दैनंदिन कार्यक्रम पार पडणार आहे. तर, सकाळी ९ ते ११ व सायंकाळी साडेआठ ते साडेदहा या कालावधीत दररोज दोन वेळा हरिकीर्तन पार पडणार आहे. यामध्ये प्रभुराज महाराज वासकर पंढरपूर, ज्ञानेश्वर माऊली झोळ करमाळा, शिवाजी महाराज काळे आळंदी, संजय महाराज पाचपोर आळंदी, लक्ष्मण महाराज मेंगडे पंढरपूर, उध्दव महाराज मंडलिक नेवासा, चांगदेव महाराज काकडे कंडारी, ॲड. जयवंत महाराज बोधले पंढरपूर, तुकाराम महाराज मुळीक आळंदी, स्वामी हरिचैतन्य सरस्वती महाराज पळसखेड सपकाळ, ज्ञानेश्वर महाराज कदम आळंदी, अर्जुन महाराज लाड बीड, अनिल महाराज पाटील बार्शी, उल्हास महाराज सूर्यवंशी आळंदी यांचे अनुक्रमे हरिकीर्तन तर संदीपान महाराज शिंदे हासेगावकर यांचे काल्याचे कीर्तन पार पडणार आहे. या उत्सवाची रामनगर व भरोसा ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली असून या भक्तिमय सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रामनगर व भरोसा येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# सैलानी यात्रेत टोळक्याची दोन युवकांना मारहाण...

जनसंचलन/बुलडाणा



तालुक्यातील पिंपळगाव सराई गट ग्रामपंचायतींतर्गत येत असलेल्या सैलानी येथे सैलानी बाबांच्या यात्रेस प्रारंभ झाला आहे. दरम्यान, या यात्रेत २५ मार्च रोजी रात्री सिनेमा टॉकीज रोडवर किरकोळ वादातून २० ते २५ युवकांनी लाठ्या काठ्यांनी दोन युवकांना मारहाण केली. त्यांच्यावर बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. या घटनेदरम्यान मारहाण करणाऱ्या युवकांनी काही घोषणाबाजीही केल्याची माहिती आहे. या घटनेत देऊळघाट येथील शेख शफिक शेख खलील (२६) आणि शेख मुजाहिद शेख हबीब (३१) हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांना रात्रीच बुलढाणा येथे उपचारासाठी दाखल केले होते. याबाबत रायपूरचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्याशी संपर्क साधला असता, रात्री किरकोळ वाद झाला होता. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या जखमी युवकांचे बयाण घेण्यात येत असल्याचे त्यांनी २६ मार्च रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास सांगितले. वादाचे नेमके कारण अस्पष्ट नेमक्या कोणत्या कारणावरून हा वाद झाला ही बाब अद्याप अस्पष्ट आहे. सैलानी यात्रेत राज्यसह दक्षिणेतील तथा उत्तर भारतातूनही भाविक येत असतात. त्यामुळे छोट्या मोठ्या बाबीवरून सैलानी यात्रेत वादाचे प्रसंग उद्भवत असतात. त्यातच सैलानी यात्रेत सीसीटिव्ही लावलेले आहेत.

# ठाकरे गटाची लोकसभा उमेदवार यादी जाहीर; अनिल देसाई, चंद्रहार पाटील यांच्यासह १७ जणांना तिकीट



वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाची बहुप्रतीक्षित लोकसभा उमेदवार यादी अखेर जाहीर झाली आहे. खासदार संजय राऊत यांनी ट्विटरवरुन १७ उमेदवारांची घोषणा केली आहे. मुंबईतील चार जागा ठाकरे गट लढवणार आहे. दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, उत्तर पश्चिम (वायव्य) मुंबईतून अमोल कीर्तिकर, उत्तर पूर्व (ईशान्य) मुंबईतून संजय दिना पाटील, नाशिकमधून राजाभाऊ वाजे, तर छत्रपती संभाजीनगर येथून चंद्रकांत खैरे यांना तिकीट देण्यात आले आहे. याशिवाय कल्याण डोंबिवली, पालघर येथील उमेदवारांची अद्याप घोषणा झालेली नाही. कोल्हापूरच्या बदल्यात सांगलीच्या जागेवरुन ठाकरेंनी उमेदवार जाहीर केला आहे. तर ईशान्य मुंबई या युतीत भाजपकडे राहिलेल्या जागेवरही ठाकरेंनी उमेदवार दिला आहे. हातकणंगलेच्या जागेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेनेच्या १७ लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर करण्यास येत आहे. मुंबई दक्षिण मध्य येथून अनिल देसाई यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात येत आहे. असे ट्वीट संजय राऊत यांनी केले आहेयाखेरीज युतीत लढवल्या जाणाऱ्या उत्तर पूर्व (ईशान्य) मुंबई (भाजप खासदार), रायगड (अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा खासदार), छत्रपती संभाजीनगर (एमआयएम खासदार) या जागांवरही सेनेने उमेदवार दिले आहेत. तर युतीतील शिवसेनेकडला शिरुर शरद पवारांकडे गेलाय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958